**ठळक बातम्या**

- देशाच्या सीमा संरक्षणाला मजबुती देण्याचं काम सीमा सुरक्षा दल करत असल्याचं अमित शहा यांचं प्रतिपादन

- चारधाम यात्रेचा आज उत्तराखंड इथे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांच्या हस्ते प्रारंभ

- सीरियाचे राष्ट्राध्यक्ष बशर अल असद राजधानी दमास्कस सोडून अज्ञातस्थळी रवाना

**आणि**

- बॉर्डर-गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा भारतावर १० गडी राखून विजय, मालिकेत १-१ अशी बरोबरी

**<><><><><>**

सीमा सुरक्षादल गेली ६ दशकं देशाच्या सीमा सुरक्षेला मजबुती देण्याचं महत्त्वपूर्ण काम करत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी केलं. ते आज जोधपूरमध्ये सीमा सुरक्षा दलाच्या ६०व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. सीमा सुरक्षा दलाच्या योगदानाशिवाय देशासमोरच्या सुरक्षा आव्हानांना सामोरं जाणं अशक्य असल्याचंही ते म्हणाले.

जोधपूरमधल्या सीमा सुरक्षा दलाच्या राजस्थान फ्रंटिरियर हेडक्वार्टरमध्ये पहिल्यांदाच संचलनाचं आयोजन करण्यात आलं आहे.

संचलनात स्वदेशी हेलिकॉप्टर ध्रुव आणि एमआय१७ देखील सहभागी झाली आहेत. यासोबतच श्वानपथकही या कार्यक्रमात सहभागी झालं असून या कार्यक्रमात ७ सैनिकांना शौर्य पुरस्कारानं सन्मानित करण्यात येत आहे.

<><><><><>

देशाच्या टीबी विरोधातल्या लढ्यात, अधिक रुग्णसंख्या असलेल्या टीबी जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित करून १०० दिवसांच्या विशेष मोहीमेमुळे देश बळकट झाला आहे असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. समाज माध्यमांवरील एका संदेशात मोदी यांनी सांगितलं की, रुग्णांना दुप्पट मदत, जन भागिदारी, नवीन औषधं, तंत्रज्ञानाचा वापर आणि निदानाची उत्तम साधनं यासह भारत विविध पद्धतींनी टीबीशी लढा देत आहे. क्षयरोगाचा नायनाट करण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याचं आवाहन त्यांनी केलं.

दरम्यान, देशव्यापी क्षयरोग निर्मूलन अभियानाला काल केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री जे. पी. नड्डा यांच्या हस्ते हरयाणात पंचकुला इथं प्रारंभ झाला. देशातली ३३ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांतल्या मिळून ३४७ जिल्ह्यांत आजपासून १०० दिवस ही मोहिम राबवली जाणार आहे. यात क्षयरोगाविषयी जनजागृती करणं आणि क्षयरोगाबद्दलच्या गैरसमजुती दूर करणं यांचा समावेश आहे.

<><><><><>

अमेरिकेच्या डॉलरशी स्पर्धा करण्यासाठी नवीन चलन सुरु करण्याचा ब्रिक्स देशांचा कोणताही विचार नाही, असं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी सांगितलं. ते कतरच्या  राजधानीत आयोजित दोहा फोरममध्ये बोलत होते.  अमेरिकी डॉलरला कमकुवत बनवण्याचा ब्रिक्स

देशांचा हेतू नसल्याचं त्यांनी सांगितलं. मात्र, या मुद्द्यावर ब्रिक्स सदस्य देश एकमत नाहीत, असंही ते म्हणाले. ब्रिक्स देशांनी जर सामायिक चलन योजना सुरू केली तर या देशांना शंभर टक्के सीमा शुल्क द्यावं लागेल अशी चेतावणी अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी एका आठवड्यापूर्वी दिली होती.

**<><><><><>**

बहुप्रतिक्षित चारधाम यात्रेचा आज उत्तराखंड इथे, मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांच्या हस्ते प्रारंभ झाला. रुद्रप्रयाग जिल्ह्यात उखीमठ इथल्या ओंकारेश्वर मंदिरात धामी यांनी यात्रेला सुरुवात झाल्याची घोषणा केली. चारधाम यात्रेकरूंना आवश्यक सोयीसुविधा पुरवण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं ते यावेळी म्हणाले. ही यात्रा सुरळितपणे तसंच सुरक्षितपणे व्हावी यासाठी मार्गदर्शक तत्वं जारी केली असून त्यानुसार व्यवस्था करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिल्याचं धामी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी भाजपाकडून आमदार राहुल नार्वेकर यांनी आज अर्ज सादर केला. यावेळी त्यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. विधानसभा अध्यक्षपदासाठी आज दुपारी बारा वाजेपर्यंत अर्ज दाखल करण्याची मुदत होती. मात्र, महाविकास आघाडीकडून कोणताही अर्ज दाखल झालेला नाही. त्यामुळे नार्वेकर हेच पुन्हा विधानसभा अध्यक्ष होतील, असा विश्वास चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्या दिवशी तात्पुरते अध्यक्ष कालीदास कोळंबकर यांनी उर्वरित नवनिर्वाचित आमदारांना

विधानसभा सदस्यत्वाची शपथ दिली. काल अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी १७३ नवनिर्वाचित आमदारांनी शपथ घेतली होती. आज नाना पटोले, राधाकृष्ण विखे पाटील, दिलीप सोपल, मंगलप्रभात लोढा, नितीन राऊत, विजय वडेट्टीवार, चंद्रशेखर बावनकुळे, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, अब्दुल सत्तार, अमित देशमुख, अस्लम शेख, तानाजी सावंत, आदित्य ठाकरे, यांनी विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. त्यानंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

सिरियामध्ये बंडखोरांनी राजधानी दमास्कस ताब्यात घेतल्याचा दावा केला असून त्यांना सरकारी सशस्त्र दलांकडून कुठलाही विरोध झाला नसल्याचं म्हटलं आहे. या दरम्यान राष्ट्राध्यक्ष बशर अल असद दमास्कस सोडून अज्ञातस्थळी रवाना झाले आहेत. माध्यमांनी दिलेल्या बातमीनुसार बंडखोरानी आज पहाटे दमास्कसमध्ये प्रवेश केला. यामुळे या भागात तणाव निर्माण झाला आहे. ही परिस्थिती लक्षात घेत लेबनाननं बैरुतला दमास्कसशी जोडणाऱ्या सीमेव्यतीरिक्त इतर सीमा बंद केल्याचं जाहीर केलं आहे. जॉर्डननं देखील सिरियालगतच्या आपल्या सीमा बंद केल्या आहेत.

**<><><><><>**

आयआयएम आणि आयआरबीनं केलेल्या एका अभ्यासानुसार भारताच्या युनिफाईड पेमेंटस् इंटरफेसनं वित्तिय समावेशन वाढवण्यात आणि समान आर्थिक विकासाला चालना देण्यात यश मिळवलं आहे. युपीआयनं आर्थिक दृष्ट्या दुर्बल समूहांना प्रथमच औपचारिक कर्ज मिळवण्यासाठी सक्षम बनवल्याचंही या अभ्यास अहवालात म्हटलं आहे. युपीआयमुळे मिळणारे फायदे भारतापुरते सीमित नसून इतर देशही लाभ मिळवत आहेत.

**<><><><><>**

भारतीय वायू दलाच्या पश्चिम कंमांडच्या कंमांडरांचं दोन दिवसांचं संमेलन काल दिल्लीत संपन्न झालं. या संमेलनात वायू दलाचे प्रमुख, एअर चीफ मार्शल ए. पी. सिंह यांनी युद्ध आणि बहुक्षेत्रीय युद्धकौशल्य मिळवण्यासाठी प्रशिक्षणाची आवश्यकता याबाबत उपस्थितांशी चर्चा केली. सिंह यांनी संमेलनाच्या यावर्षीच्या ‘भारतीय वायू दल - सशक्त, सक्षम आणि आत्मनिर्भर’ या संकल्पनेवर भर दिला.

**<><><><><>**

मानवतावादी मदत म्हणून भारताने म्यानमारला २ हजार २०० मेट्रिक टन तांदळाचा पुरवठा केल्याची माहिती, परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी दिली. भारताच्या ॲक्ट ईस्ट आणि नेबरहूड फर्स्ट या धोरणांतर्गत भारत मानवतावादी मदत करत आहे, असं जयस्वाल म्हणाले.

**<><><><><>**

बॉर्डर गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतला ॲडलेड इथं झालेल्या दुसऱ्या दिवसरात्र सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारताचा १० गडी राखून पराभव केला. या विजयासोबतच ऑस्ट्रेलियानं पाच सामन्यांच्या मालिकेत १ - १ अशी बरोबरी साधली आहे.

आज सामन्याच्या तिसऱ्या दिवशी भारतानं आपला दुसरा डाव ५ बाद १२८ धावसंख्येवरून पुढे सुरू केला. मात्र दिवसाच्या पहिल्याच षटकात ऋषभ पंत माघारी परतला. त्यानंतरही भारताचे फलंदाज ठराविक अंतरानं बाद होत गेले आणि भारताचा दुसरा डाव केवळ १७५ धावांतच आटोपला. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्स यानं भारताचा निम्मा संघ बाद केला. भारताच्या वतीनं नितीश रेड्डी यानं सर्वाधिक ४२ धावा केल्या.

ऑस्ट्रेलियानं पहिल्या डावात भारतावर १५७ धावांची आघाडी घेतली होती. त्यामुळे दुसऱ्या डावात त्यांच्यासमोर विजयासाठी केवळ १९ धावांचं आव्हान उरलं. ते ऑस्ट्रेलियानं कोणताही गडी न गमावता पूर्ण केलं. पहिल्या डावातला शतकवीर ट्रॅव्हिस हेड याला सामनावीराच्या किताबानं गौरवलं गेलं. मालिकेतला तिसरा सामना येत्या १४ डिसेंबरपासून ब्रिस्बेन इथं होणार आहे.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या महिला क्रिकेट संघांमध्ये आज ब्रिस्बेन इथं झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारतावर १२२ धावांनी विजय मिळवला. या विजयासोबत ऑस्ट्रिलेयानं तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे.

या सामन्यात ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. त्यानंतर जॉर्जिया आणि एलिसे यांच्या शतकी खेळींच्या जोरावर निर्धारीत ५० षटकांत ८ बाद ३७१ धावा केल्या. विजयासाठी ३७२ धावांचा पाठलाग करताना भारताचा संपूर्ण संघ ४४ षटकं आणि ५ चेंडूंमध्ये २४९ धावा करून माघारी परतला.

<><><><><>

दुबई इथं १९ वर्षांखालच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज भारत आणि बांग्लादेश यांच्यात अंतिम सामना सुरू आहे. या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा बांग्लादेशाच्या ४५ व्या षटकात ८ बाद १७५ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//